कोषागारातून रोख देय अनुदान
केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी अनुसुचित जमाती घटकासाठी केंद्र हिश्श्याचे अनुदान वितरीत करण्याबाबत.
(लेखाशीर्ष २२१५ ९८६२)

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः स्वभामि-२०१७/प्र.क्र.८१/पापु-१६
७ वा मजला, जी.टी. रूग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ००१.
दिनांक: २२ मार्च, २०१८

वाचा

१. **केंद्र शासनाचे मंजूरी आदेश क्रमांक:** एस-१२०११/७/२०१५-एसबीएम,दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८.
२. **केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) संदर्भातील मार्गदर्शक सूचना:** दि.१८ डिसेंबर, २०१४.
३. **पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन परिपत्रक क्रमांकः** स्वभामि-२०१४/प्र.क्र.२७/पापु-०८, दि.७ नोव्हेंबर, २०१४.
४. **पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन पत्र क्रमांक:** स्वभामि-२०१५/प्र.क्र.१९४/पापु-०८, दि.११ जानेवारी, २०१६.
५. **आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:** बीयुडी-२०१७/प्र.क्र.०६ / कार्यासन ६, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७.
६. **वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांकः** अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल,२०१७.
७. **पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन निर्णय क्रमांक:** स्वभामि-२०१७/प्र.क्र.८१/पापु-१६, दि.११ जूलै,२०१७.
८. **पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन निर्णय,दिनांक** स्वभामि-२०१७/प्र.क्र.८१/पापु-१६, दि.२९ नोव्हेंबर, २०१७.
९. **पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,शासन शुध्दीपत्रक,दिनांक** स्वभामि-२०१७/प्र.क्र.८१/पापु-१६, दि.१६ जानेवारी २०१८.

प्रस्तावना

केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) योजनेअंतर्गत केंद्र हिश्याच्या जनजाती क्षेत्र उपयोजना घटकासाठी (अनुसुचित जमाती घटक) २२१५ ९८६२ या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ या वर्षाकरीता रु.३०२९१.५० लक्ष नियतव्यय मंजुर करण्यात आला असून तो पुर्णपणे अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. उक्त वाचा क्र.७ व ८येथील शासन निर्णयान्वये केंद्र शासनाकडून प्राप्त केंद्र हिश्श्याचा पहिल्या व दुसऱ्या हप्त्याचा रु. ६४९२.०२लक्ष एवढा निधी वितरित करण्यात आलेला आहे. उक्त वाचा अ.क्र.१ येथील केंद्र शासनाच्या मंजूरी आदेशान्वये स्वच्छ भारत मिशन (ग्रा.)

अंतर्गत अनुसूचीत जमाती घटकासाठी सन २०१७-१८ या अर्थिक वर्षाच्या तिसऱ्या हप्त्यापोटी केंद्र हिश्श्याचा रू. ६६०७.२६लक्ष (रू.सहासष्ट कोटी सात लक्ष सव्वीस हजार फक्त) इतका निधी राज्यास प्राप्त झाला असून सदर निधी राज्याच्या एकत्रित निधीत जमा झाल्याचे वित्त विभागाने कळविले आहे. सदर निधी हा मागणी क्र.टी-५ खाली असल्याने, आदिवासी विकास विभागाने वाचा अ.क्र.५ येथील शासन निर्णयान्वये पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे हा निधी सुपूर्द केला असून सदर उपलब्ध निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>

केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) योजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता अनुसुचित जमाती घटकासाठी केंद्र हिश्श्याच्या तिसऱ्या हप्त्यापोटी रू. ६६०७.२६लक्ष (रू.सहासष्ट कोटी सात लक्ष सव्वीस हजार फक्त) इतका निधी वितरणासाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या ऑक्टोबर,२०१७ मधील सुधारीत मार्गदर्शक सूचनेनुसार माहिती, शिक्षण व संवाद (IEC) आणि क्षमता बांधणी इत्यादीसाठी केंद्र हिश्श्याचा ५ % निधी राज्यात खर्च करणे आवश्यक आहे. उपलब्ध रु. ६६०७.२६लक्ष निधीपैकी राज्यस्तरावरील प्रशासकीय खर्चासाठी रु.१३.२१ लक्ष इतका निधी संचालक,पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांचे अधिनस्त ठेवण्यास या शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात येत आहे. जिल्हा परिषदांना वितरीत करावयाचे रू.६५९४.०५ लक्ष (रू.पासष्ट कोटी,चौऱ्याण्णव लक्ष,पाच हजार फक्त) इतके अनुदान संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील स्तंभ क्र. ३ नुसार अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे रोख स्वरूपात वितरित करण्यास या शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात येत आहे.जिल्हा परिषदांना वितरित करण्यात येत असलेल्या सदर निधीतून जिल्हा परिषदांनी ५ % निधी माहिती, शिक्षण व संवाद (IEC) आणि क्षमता बांधणी इत्यादीसाठी खर्च करावा. वितरित करण्यात येत असलेला सदर निधी जिल्हा परिषदांनी सदर आदेश निर्गमित झाल्यापासून तात्काळ खर्च करावा अन्यथा आपणास आवश्यकता नाही असे समजून सदर निधी इतर जिल्ह्यात वळविण्यात येईल. सदर अनुदान हे सशर्त मंजूर करण्यात येत आहे.

०२. “राज्यस्तरावर संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांचेकडे ठेवण्यात आलेली रू. १३.२१ लक्ष एवढी रक्कम आहरण व संवितरण अधिकारी तथा वित्त नियंत्रक, रिफॉर्म सपोर्ट व प्रोजेक्ट मॅनेजमेंट युनिट (जलस्वराज्य प्रकल्प टप्पा-२), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे BEAMS प्रणालीवर वितरीत करण्यात येत आहे. सदर रक्कम रू १३.२१ लक्ष (रूपये तेरा लक्ष, एकवीस हजार फक्त) अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई यांच्या कार्यालयातून आहरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी तथा वित्त नियंत्रक, रिफॉर्म सपोर्ट व प्रोजेक्ट मॅनेजमेंट युनिट (जलस्वराज्य प्रकल्प टप्पा-२) (श्री. एन.व्ही. कोंगले), पाणी पुरवठा व स्वच्छता

विभाग,मंत्रालय, मुंबई यांना व नियंत्रक अधिकारी म्हणून उप सचिव तथा प्रकल्प संचालक, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (श्री.रुचेश जयवंशी), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. आहरण व संवितरण अधिकारी तथा वित्त नियंत्रक, रिफॉर्म सपोर्ट व प्रोजेक्ट मॅनेजमेंट युनिट (जलस्वराज्य प्रकल्प टप्पा-२) (श्री. एन.व्ही. कोंगले), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी रू. १३.२१ लक्ष इतकी रक्कम अधिदान व लेखाधिकारी, मुंबई यांच्या कार्यालयातून आहरीत करून स्वतंत्र धनादेशान्वये संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, नवी मुंबई यांच्याकडे सुपूर्द करावी".

०३. या शासन निर्णयाद्वारे मुक्त केलेली रक्कम पुढील अटींवर मंजूर करण्यात येत आहे.

अ) या शासन निर्णयाद्वारे मंजूर केलेले अनुदान ज्या करणासाठी मंजूर करण्यात आले आहे त्याच करणासाठी खर्च करण्यात यावे. संबंधित जिल्हा परिषदा/संस्था यांनी या शासन निर्णयाद्वारे मुक्त केलेला निधी, या कार्यक्रमासाठी उघडलेल्या स्वतंत्र बँक खात्यात जमा करावा.

आ) संबंधित जिल्हा परिषदेने/संस्थेने या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या अनुदानापेक्षा जास्त खर्च करू नये.

इ) अट क्र.३-अ आणि ३-आ यांची पुर्तता झाली आहे याची खात्री करण्यासाठी, महालेखापाल-१, मुंबई व महालेखापाल-२, नागपूर यांच्याकडे जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी लेखे तपासणीसाठी सर्व कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत.

ई) सदर रक्कम केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील तरतूदींनुसार तसेच या संदर्भात राज्य शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनेप्रमाणे/ आदेशाप्रमाणे खर्च करण्यात यावी.

उ) ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाचा विहित नमून्यातील मासिक प्रगती अहवाल प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत शासनास पाठविण्याची दक्षता घ्यावी. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनेप्रमाणे जिल्हा परिषदांनी या अनुदानाच्या खर्चाचा महालेखापाल कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालावा व ताळमेळाचे अहवाल विहित कालावधीत या विभागातील पापु-०४, पापु-१६ व पापु-२० या कार्यासनांस सादर करावा.

ऊ) पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांनी निधी वितरण, खर्च याबाबतची नोंद केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर (IMIS) घेण्याची दक्षता घ्यावी.

ऋ) सदर रक्कम खर्च करताना वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल, २०१७ मधील अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करून आवश्यक बाबींची पुर्तता करून कार्यपूर्ती अहवाल/नमूद प्रमाणपत्रे शासनास त्वरीत सादर करावीत.

ॡ) सदर रक्कम खर्च झाल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास त्वरित सादर करावे.

०४. हा खर्च "मागणी क्रमांक टी-५, २२१५- पाणी पुरवठा व स्वच्छता, ०२ जलनि:स्सारण व स्वच्छता, ७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना,

(०१) (०३) स्वच्छ भारत अभियानातंर्गत वैयक्तिक स्वच्छालय बांधणे (२२१५ ९८६२)" ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली खर्ची घालावा.सदर अनुदान सशर्त मंजूर करण्यात येत आहे.

०५. सदर शासन निर्णय आदिवासी विकास विभागाचा शासन निर्णय क्र.बीयुडी-२०१७/ प्र.क्र.०६/कार्यासन-६,दि.१४ नोव्हेंबर,२०१७ अन्वये, निधी वितरणाबाबत विभागास प्रदान केलेल्या अधिकारात व वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३,दि.१८एप्रिल,२०१७ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या अधिकारात तसेच सदर परिपत्रकातील अटी व शर्तींच्या अधीन राहून मुक्त करण्यात येत आहे. उपरोक्त रु. ६६०७.२६ लक्ष एवढा केंद्र निधी राज्याच्या एकत्रित निधीत जमा झाल्याबाबतची खात्री वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेकडुन करण्यात आली आहे. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/ प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल, २०१७ मधील परिपत्रकातील परिच्छेद ७ ते १८ मधील तसेच सदर परिपत्रकासोबतच्या परिशिष्टातील अ.क्र. १ ते ८ व अ.क्र.८मधील तपासणीसुचीतील अ.क्र.१ ते १० मधील लागू असलेल्या अटी व शर्तीची पुर्तता होत असल्याचे प्रमाणीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२२१४५९२११२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Smita Sachin Rane

Digitally signed by Smita Sachin Rane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f85d92aa99ea42eb86747707e3c3a129af986c1f95f6bc3e8165ceaf5155e6e7, serialNumber=4b9befd340493837db4cffafa6b96eeaf6aa3c12a7a6bf0467b0f517b724e8ee, cn=Smita Sachin Rane
Date: 2018.03.22 16:11:19 +05'30'

(स्मि. स. राणे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
२. मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.प्रधान सचिव, पाणी
३. पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४. महालेखापाल, महाराष्ट्र- १/२ मुंबई/नागपूर (लेखा परीक्षा व अनुज्ञेयता)
५. विभागीय आयुक्त, सर्व.
६. उपायुक्त, विकास/आस्थापना, सर्व विभागीय आयुक्त यांचे कार्यालय.
७. जिल्हाधिकारी व सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती सर्व.
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
९. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१०. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/नागपूर.
११. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, (WSSO), बेलापूर, नवी मुंबई.
१२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा.व स्व.), जिल्हा परिषद, सर्व.
१३. उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, जिल्हा परिषद, सर्व.
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.

१५. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
१६. नियोजन विभाग, (का.क्र.१४४३) मंत्रालय, मुंबई.
१७. आदिवासी विकास विभाग, (कार्यासन-६) मंत्रालय, मुंबई.
१८. वित्त विभाग, (व्यय-३) मंत्रालय, मुंबई.
१९. कार्यासन क्र.पापु-०४, पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०. निवड नस्ती, कार्यासन पापु-१६.

विवरणपत्र

केंद्र पुरस्कृत स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत अनुसुचित जमाती घटकासाठी सन २०१७-१८ करिता केंद्र हिश्श्याच्या अनुदानाचे वितरण (लेखाशिर्ष २२१५ ९८६२).

शासन निर्णय क्र.स्वभामि-२०१७/प्र.क्र.८१/पापु-१६, दिनांक २२ मार्च, २०१८ सोबतचे सहपत्र.

(रू.लाखांत)

अ.क्र.	जिल्हा परिषद	या शासन निर्णयान्वये वितरित करण्यात येत असलेला निधी
१	२	३
१	वासो	१३.२१
२	ठाणे	०.००
३	रायगड	४१६.६७
४	रत्नागिरी	०.००
५	सिंधुदूर्ग	०.००
६	पालघर	०.००
७	नाशिक	६४२.९७
८	धुळे	४८६.७८
९	नंदूरबार	३०००.००
१०	जळगाव	०.००
११	अहमदनगर	०.००
१२	पुणे	०.००
१३	सातारा	०.००
१४	सांगली	०.००
१५	सोलापूर	०.००
१६	कोल्हापूर	०.००
१७	औरंगाबाद	०.००
१८	जालना	०.००
१९	परभणी	०.००
२०	हिंगोली	०.००
२१	बीड	०.००
२२	नांदेड	६८५.२५
२३	उस्मानाबाद	०.००
२४	लातूर	०.००
२५	अमरावती	३१९.२०
२६	अकोला	०.००
२७	वाशिम	०.००
२८	बुलढाणा	०.००
२९	यवतमाळ	५४०.६०
३०	नागपूर	०.००

अ.क्र.	जिल्हा परिषद	या शासन निर्णयान्वये वितरित करण्यात येत असलेला निधी
३१	वर्धा	०.००
३२	भंडारा	०.००
३३	गोंदिया	०.००
३४	चंद्रपूर	०.००
३५	गडचिरोली	५०२.५८
एकूण		**६६०७.२६**
अक्षरी रूपये		**सहासष्ट कोटी सात लक्ष सव्वीस हजार फक्त**

Smita Sachin Rane

Digitally signed by Smita Sachin Rane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f85d92aa99ea42eb86747707e3c3a129af986c1f95f6bc3e8165ceaf5155e6e7, serialNumber=4b9befd340493837db4cffafa6b96eeaf6aa3c12a7a6bf0467b0f517b724e8ee, cn=Smita Sachin Rane
Date: 2018.03.22 16:11:46 +05'30'

(स्मि.स.राणे)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन